# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.२२/०८/२०१९

## दि.२१/०८/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३३२/१९,भादविक ३९२ |
| **फिर्यादी** | गणेश विलास शेलार, वय-३८ वर्षे,रा.गुरुवार पेठ,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील एक अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/०८/२०१९ रोजी रात्रौ ०२.१५ वा ते ०२.३० वा. चे दरम्यान ३६५ गुरुवार पेठ, रंगारी बोळ, पुणे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे राहते घरा जवळील बोळीतुन जात असताना,एका अनोळखी इसमाने त्यांचे पाठीमागुन येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चेन ४५,०००/- रु किमतीची जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेली. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलिस निरीक्षक, उमाजी राठोड ८८०५१६२६९१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ३२६/१९,भादविक २७९,३३८,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट १८४, ११९/१७७ |
| **फिर्यादी** | गजानन साने,वय-४४ वर्षे,रा.कलापुर कॉलनी,खुळेवाडी,चंदननगर,पुणे |
| **आरोपी** | ट्रॅक्टरवरील अज्ञात चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०८/२०१९ रोजी सकाळी ११/४५ वा. जुना मुढवा रोड,सर्वोदय हॉटेलजवळ,कोटक महींद्रा एटीएम समोर पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा मित्र नामे अनिल पेठारे याचेसह मोटार सायकलवरून जात असताना,त्यावेळी फिर्यादी यांचे समोर रोडच्या कडेला उभे असलेल्या पांढऱ्या रंगाच्या कार चालकाने त्याचे कारचा दरवाजा अचानकपणे बेजबाबदारपणे उघडला. त्यामुळे अनिल पेठारे याचा मोटार सायकलचा तोल जावून ती कारचे पुढील उजव्या बाजुस धडकुन दोघेही रस्त्यावर खाली पडलो. त्यावेळी त्यांचे पाठीमागुन येणारा ट्रॅक्टरवरील चालक याने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर हा भरधाव वेगाने चालवून फिर्यादी व अनिल पेठारे यांचे अंगावर व पाया वरुन ट्रॅक्टरचे चाक जावून,त्यामध्ये त्यांचे उजव्या पायास फ्रॅक्चर होऊन,फिर्यादी व अनिल पेठारे हा गंभीर जखमी होवुन,त्यामध्ये अनिल पेठारे,वय-३८ वर्षे,रा.खुळेवाडी, चंदन नगर,पुणे हा मयत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.पी.भोसले ९४२०७३३८५५ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ५९४/१९,भादविक ३२६,३४१,३२३,१४३,१४७,१४८,१४९ |
| **फिर्यादी** | अकालसिंग भादा,वय-२८ वर्षे,रा. बालाजीनगर,येरवडा,पुणे |
| **आरोपी** | १.करणसिंग भारतसिंग बावरी,वय-२० वर्षे,रा.मांगीरबाबा मंदीरा शेजारी,येरवडा,पुणे (अटक) व इतर चार |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०८/२०१९ रोजी १९/०० वा. पोस्ट ऑफिस चौक येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचा मेव्हणा लकिसिंग उर्फ जलुसिंग जुनी असे फिर्यादी यांचे मोटार सायकलवरुन पोस्ट ऑफिस चौक,येरवडा,पुणे येथून जात असताना,यातील नमुद इसमांनी संगनमत करून,तुम भाई बन गये क्या साले असे म्हणून शिवीगाळ करून,लखनसिंग भारतसिंग बावरी याने हाता मध्ये स्टिलचा रॉड घेवून फिर्यादीचे मोटार सायकलला आडवून फिर्यादीचा मेहुणा यांचे डोक्यात,छातीत मारहाण केली. तेव्हा फिर्यादी त्यास सोडवत असताना फिर्यादीचे मानेवर व पाठीवर मारहाण केली. |

| | |
|---|---|
| | तसेच लाथा-बुक्यांनी व हाताने मारहाण केली. त्यावेळी फिर्यादी हे खाली पडले असता,फिर्यादी यास लालासिंग बावरी याने त्याचे जवळ असलेला लाकडी बांबुने फिर्यादीचे डाव्या पायाचे टाचेचे घोटया जवळ मारुन फ्रॅक्चर करुन जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलिस निरीक्षक, आर.बी.गिरमरक ८८०५५७३७३३ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ५६९/१९,भादविक ४०६,४२० |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-२६ वर्ष,रा.आंबेगाव-बुद्रुक,पुणे |
| **आरोपी** | एक अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०८/२०१९ रोजी १३/४५ वा. एचडीएफसी बँक,वाल्हेकर प्रार्पटीज,मुंबई-बेगलोर हायवे सर्व्हिस रोड जवळ,न-हे,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद अनोळखी इसमाने फिर्यादी यांचे जवळ येवुन,त्यांना बोलण्या मध्ये गुंतवुन,त्यांचा विश्वास संपादन करुन,त्यांचेकडील असलेल्या रोख रूपये मधील २,०००/- रू किच्या एकुण ०६ नोटा असे १२,०००/- रूपये रक्कम हातचलाखीने काढुन घेवुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. आर.जे.पाटील ९५९५५१५९११ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ३२५/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३८ वर्षे,रा.वडगाव-शेरी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईल नबंरधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०८/२०१९ रोजी १७/१५ ते १८/१५ वा.चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईल नबंरधारकाने फिर्यादी यांना मी सेन्ट्रल बॅक ऑफ इंडीया, ब्रान्द्रा,मुबंईचे या शाखेतुन बोलत आहे असे सांगुन,तुमचे सेन्ट्रल बॅंकेचे एटीएमकार्ड बंद पडले आहे,तुम्हाला नविन कार्ड देतो असे सांगुन, एटीएम कार्डवरील १६ अंकीनंबर, सिव्हिव्ही नंबर व मोबाईलनबंरवर आलेले ओटीपी विचारुन,फिर्यादी यांचे बॅंकेचे खात्यातुन एकुण ९८,४७८/- रूची ऑनलाईन ट्रान्सफर करुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी. सत्यवान पाटील,(गुन्हे), ९५४५९०३१०० |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे ३८२/१९,भादविक ३५३,३३२,३२४,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | संदेश राऊत, पो.शि. दत्तवाडी वाहतुक विभाग,पुणे शहर |
| **आरोपी** | १.ओम ऊर्फ प्रभाकर प्रभाकर सुरवसे,वय-२०,रा.सनं.१३३,दांडेकर पुल,पुणे २.फैयाज मोहम्मद गौस शेख,वय-१९,रा.पंचतारा सोसा.दांडेकर पुल,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०८/२०१९ रोजी १३/४५ वा. दांडेकर पुल सिग्नल चौकात सिहगड रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे दत्तवाडी ट्रॉफिक विभागाचेवतीने नाथ पै चौक -दांडेकर पुल-नवश्या मारुती चौक या परिसरात पो.हव.शिंदे यांचे बरोबर पेट्रोलींग डयुटी करीत असताना,नमुद इसम हे कारचालक यास हाताने मारहाण करुन शिवीगाळ करीत असताना,फिर्यादी हे त्यांना वाचविण्यासाठी गेलो असता,सदर इसमांनी फिर्यादी यांचेवर हल्ला चढवुन,रस्त्याच्या कडेला पडलेला दगड उचलुन तो फिर्यादी यांना मारून,पळुन जावुन,फिर्यादी हे करीत असलेंल्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलिस निरीक्षक, एस.वाय.धुमाळे ८८०५०२३०५० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**